महाराष्ट्र शिक्षण सेवा गट ब (तां.) या संवर्गातील प्राचार्य/उपप्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुख्याध्यापक/अभियांत्रिकी अधिक्षक, शासकिय तंत्र माध्यमिक शाळा या पदांवर सरळसेवेने नियुक्ती.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन आदेश क्रमांक: व्यशिअ-२०१५/(३७६/१५)/व्यशि-१
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३० ऑक्टोबर, २०१७.

संदर्भ :- १) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे गोपनीय पत्र क्र.१५(२)(१२०)/७१०/सात-अ, दिनांक २३ सप्टेंबर, २०१५.
२) मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे रिट पिटीशन क्र.१०१०३/२०१५ श्रीमती रजनी खोब्रागडे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर यामध्ये दि.१६.४.२०१६ व दि.३.१०.२०१६ रोजी पारीत केलेले अंतरीम आदेश.
३) मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे रिट पिटीशन क्र.१०१०३/२०१५ श्रीमती रजनी खोब्रागडे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर यामध्ये दि.३१.३.२०१७ रोजी पारीत केलेले अंतिम आदेश.

आदेश

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत महाराष्ट्र शिक्षण सेवा गट ब (तांत्रिक) या संवर्गातील प्राचार्य/उपप्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुख्याध्यापक /अभियांत्रिकी अधिक्षक, शासकिय तंत्र माध्यमिक शाळा, या पदांवर वेतनश्रेणी रु.९३००-३४८००/- ग्रेड पे रु ४८००/- मध्ये खाली नमूद केलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवारांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये, ते ज्या दिनांकापासून पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून २ वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी नामनिर्देशनाद्वारे तात्पुरती नियुक्ती खालीलप्रमाणे करण्यात येत आहे:-

अ. क्र.	उमेदवाराचे नाव	गुणवत्ता क्रमांक	मूळ प्रवर्ग	नियुक्तीचा प्रवर्ग	नामनिर्देशानाद्वारे करावयाचे नेमणुकीचा विभाग व ठिकाण.
१	२	३	४	५	६
१	श्री.हरीदास प्रदिप दामोदर	२०	Open	Against Open Female २	**(नाशिक विभाग)** प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कर्जत, जि. अहमदनगर.
२	श्री.केसकर अतुल अशोक	२९	Open	Against Open Female ३	**(नागपूर विभाग)** प्राचार्य, औ.प्र.संस्था, सिरोंचा, जि. गडचिरोली.

अ. क्र.	उमेदवाराचे नाव	गुणवत्ता क्रमांक	मूळ प्रवर्ग	नियुक्तीचा प्रवर्ग	नामनिर्देशानाद्वारे करावयाचे नेमणुकीचा विभाग व ठिकाण.
१	२	३	४	५	६
३	श्री.शेख मोहम्मद अब्दुल खालिक मोहम्मद सादिक	३१	Open	Against Open Female ४	**(औरंगाबाद विभाग)** प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देवणी, जि.लातूर.
४	श्री.कदम संतोष साहेबराव	३३	Open	Against Open Female ५	**(नाशिक विभाग)** प्राचार्य, औ.प्र.संस्था, अक्कलकुवा, जि.नंदूरबार.
५	श्री.बिडकर मनोज मधुकर	३५	Open	Against Open Female ६	**(नागपूर विभाग)** प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिमूर, जि.चंद्रपूर.
६	श्री.जैन प्रकाश सुमनलाल	४२	Open	Against Open Female ७	**(नाशिक विभाग)** उपप्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धुळे, जि.धुळे.
७	श्री.थोटे विकास विश्वास	४३	Open	Against Open Female ८	**(नागपूर विभाग)** प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चामोर्शी, जि.गडचिरोली.
८	श्री.धुर्वे गोपाल रामेश्वर	८४	ST	Against ST Female - १	**(नागपूर विभाग)** प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भामरागड, जि.गडचिरोली.
९	श्रीमती शिरसाट विशाखा बाजीराव	८५	SC	SC Female - ३	**(अमरावती विभाग)** प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, संग्रामपूर, जि.बुलढाणा.
१०	श्री.पिंडकुरवार नितीन दत्तात्रयराव	८६	ST	Against ST Female - २	**(औरंगाबाद विभाग)** प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, निलंगा, जि.लातूर.
११	श्रीमती भोपे तृप्ती रामचंद्र	८७	Open	Open Female - १	**(नाशिक विभाग)** प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमळनेर, जि.जळगाव.

२. सदर नियुक्ती खालील अटींच्या अधीन राहील :-

(अ) i) मागासवर्गीय उमेदवारांचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या मुदतीत प्राप्त न झाल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

ii) चारित्र पडताळणी व वैद्यकीय तपासणीचा अहवाल यास अधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

iii) उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती सरळसेवा प्रवेश नियुक्तीसाठी विहीत केलेल्या नियमाच्या अधीन राहून ते यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्या परीक्षा त्यांना विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांची एक वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

iv) उपरोक्त उमेदवारांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रशिक्षण-२०००/ प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/०३/२००३ मधील तरतुदीनुसार संगणक हाताळणे/ वापराबाबतचे शासन मान्यताप्राप्त प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत विभाग प्रमुखाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

v) परिविक्षाधीन कालावधीत संबंधित उपरोक्त उमेदवारांनी कामाचा दर्जा प्राप्त न केल्यास किंवा विहीत विभागीय परीक्षा काही असल्यास विहीत कालावधीत उत्तीर्ण न केल्यास किंवा त्यांचे काम किंवा वर्तणूक समाधानकारक न आढळल्यास त्यांना कोणतीही पूर्व सूचना न देता सेवेतून कमी करण्यात येईल.

vi) उपरोक्त उमेदवारांची महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (तां.) या संवर्गातील ज्येष्ठता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गुणवत्ताक्रमानुसार आणि विहीत मुदतीत त्यांनी त्यांच्या पदाचा कार्यभार स्विकारल्यावर/मुदतवाढीवर अवलंबून राहील.

vii) उपरोक्त उमेदवारांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात यावे.

viii) उपरोक्त उमेदवाराला शासन निर्णय, शालेय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक:एससीटी ६५६३/ए, दि. १८ जानेवारी, १९६३ अन्वये विहीत करण्यात आलेला करारनामा करावा लागेल. याबाबत संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

ix) वरील उमेदवाराने त्याच्या नावासमोर निर्देशिलेल्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत रुजू व्हावे.

x) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: अंनियो-१००९/ प्र.क्र.३२/ सेवा-४, दि. १८/८/२००९ मधील तरतुदीनुसार दि.१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तिवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे त्याच किंवा अन्य विभागातील निवृत्तिवेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील नियुक्तीसाठी दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी किंवा त्यानंतर अर्ज केला असेल तर अशा प्रकरणी शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक:अंनियो-१००६/८७/सेवा-४ दि.१२ जानेवारी, २००७ मधील (i) ते (iv) येथे नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन), नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील. दि.१८/८/२००९ च्या परिपत्रकात नमूद (i) ते (iv) येथील अटींची पूर्तता ज्या प्रकरणी होत नसेल, अशा शासकीय कर्मचाऱ्यास नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल.

(ब) उपरोक्त बाबींशिवाय यापुर्वी शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांची नियुक्ती खालील नमूद करण्यात आलेल्या दस्ताऐवजांच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

i) चारित्र्य पडताळणी व वैद्यकीय तपासणी बाबतच्या सेवापुस्तकातील नोंदीची साक्षांकित छाया प्रत.

ii) मागील ५ वर्षातील त्यांचे गोपनीय अहवालाच्या छायाप्रती.

iii) विभागीय चौकशी सुरु आहे किंवा प्रस्तावित आहे, या बाबतची माहिती.

iv) उमेदवार मागासवर्गीय असल्यास संचालक, समाजकल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडुन अथवा संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून जातीदावा प्रमाणपत्राची तपासणी केली आहे काय, असल्यास साक्षांकीत प्रत.

३. उपरोक्त उमेदवारांना वर नमूद केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील राज्यसेवा अधिकाऱ्यांना जे सेवाविषयक नियम लागू आहेत ते लागू होतील.

४. उपरोक्त उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता देण्यात येणार नाही.

५. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांना संबंधित पदावर रुजू करुन घेण्याची कार्यवाही तात्काळ करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा. तसेच या संबंधीची आवश्यक ती अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

६. मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने रिट पिटीशन क्र.१०१०३/२०१५ (रजनी खोब्रागडे विरुध्द महाराष्ट्र शासन) या प्रकरणी दि.३१.३.२०१७ रोजी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित केले आहेत:-

"　Considering the above, the challenge to judgment of the Tribunal impugned in the present petition, so also the circular dated 13.08.2014 fails. The Writ petition is dismissed, however, With no order as to costs.

At this stage, the learned counsel for the petitioner seeks for continuation of the interim orders passed earlier. The learned counsel for respondents oppose the said request. However, considering the fact that, interim relief was operating during the pendency of writ petition, said interim orders are continued for a period of three (03) weeks from today. Needless to state on lapse of three (03) weeks, interim protection granted shall come to an end. "

मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने सदरहू नियुक्त्या करण्यात येत आहेत.

७. तसेच सदरहू नियुक्त्या ह्या सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विविध न्यायालयामध्ये दाखल झालेल्या विविध न्यायालयीन प्रकरणांच्या आधिन राहून करण्यात येत आहेत.

८. याशिवाय सदरहू नियुक्त्या ह्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र.२३२५३/२०१७ महाराष्ट्र लोकसेवा आयोग विरुध्द श्री.भारत सर्जेराव कराड, रिट याचिका क्र.२३२५४/२०१७ महाराष्ट्र लोकसेवा आयोग विरुध्द श्री.लक्ष्मण कृष्णा निर्मळ व रिट याचिका क्र.२३२५५/२०१७ महाराष्ट्र लोकसेवा आयोग विरुध्द श्री.किशोरकुमार नारायण लोणकर या न्यायालयीन प्रकरणांच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहेत.

९. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक: २०१७१०३०१२५४१७७८०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD And E Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c6d1f4d2e41b8e84bb98ddddcac3054927f82f9c1a5810e2874cdac2c44c28c2, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2017.10.30 12:42:07 +05'30'

(स.दि.खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक ,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,म.रा., मुंबई-१.
२) मा.मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे खाजगी सचिव.
३) मा.राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे खाजगी सचिव.
४) मा.प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहायक.

५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ५^{१/२} , ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई-४०० ०२१. (पत्राद्वारे)

६) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.

७) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

८) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व संबंधित संचालकांमार्फत)

९) उपकोषागार अधिकारी, (सर्व संबंधित संचालकांमार्फत).

१०) श्री.हरिदास प्रदीप दामोदर, घर क्र. १९२३, हरिदास वेस, पंढरपूर, जि. सोलापूर ४१३३०४.

११) श्री.केसकर अतुल अशोक, प्लॉट क्र. ०१, सी-सेक्टर, एम.आय.टी. शाळेजवळ, एन-४, सिडको, औरंगाबाद.

१२) श्री.शेख मोहम्मद अब्दुल खालिक मोहम्मद सादिक, एस.नं.४७, फ्लॅाट नं. ६, राजयोग अपार्टमेंट, मित्र मंडळ सोसायटी, वडगांव, पुणे ४११०१४.

१३) श्री.कदम संतोष साहेबराव, लक्ष्मी कॉलनी,जुना औसा रोड,-बंधु-प्रेम समोर,लातूर ४१३५३१.

१४) श्री.बिडकर मनोज मधुकर, ब्लॉक नं. १/अ, जुळे सोलापूर, दोंदेनगर शिक्षक सोसायटी, पोस्ट ऑफिस - इंदिरानगर, सोलापूर ४१३००४.

१५) श्री.थोटे विकास विश्वास, C/o कल्याणकर, फुलेनगर, अर्धापूर, ता.अर्धापूर, जि. नांदेड .

१६) श्री.धुर्वे गोपाल रामेश्वर, C/o रमेश चन्ने, नंदनवन कॉलनी, नवीन बस स्टँड समोर, आरमोरी, ता. आरमोरी, जि.गडचिरोली.

१७) श्रीमती शिरसाट विशाखा बाजीराव, व्यंकटेश नगर, साक्षी अपार्टमेंट जवळ, शेगांव, जि.बुलढाणा.

१८) श्री.पिंडकुरवार नितीन दत्तात्रयराव, बी-१०२, देवेन मोती स्वरुप, बीड बायपास, पटेल लॉन शेजारी, औरंगाबाद-४३१००५.

१९) श्रीमती भोपे तृप्ती रामचंद्र, बी ५/२, कसलीवाल क्लासिक, तपाडीया नगर, दर्गा रोड, औरंगाबाद-४३१००५.

२०) निवडनस्ती (व्यशि-१).